महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक– दुरुस्ती-१०१७/प्र.क्र.५१५/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१७.

विषय :- पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण), यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस निवासस्थानांची स्थापत्य व विद्युतविषयक दुरुस्तीची कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ दुरुस्ती-कार्यक्रम-आढावा/ ३७१/ २००९, दिनांक ०१.०९.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण), यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस निवासस्थानांची स्थापत्य व विद्युतविषयक दुरुस्तीची कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी संबंधित उपविभागीय अभियता, सार्वजनिक बांधकाम, यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केलेले रु.७९९.०० लक्ष इतक्या खर्चाचे अंदाज *(estimates of cost)* सादर केले आहेत. हे खर्चाचे अंदाज संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते पुढीलप्रमाणे सुधारित केले आहेत:-

अ.क्र. *(१)*	**कामाचे नाव** *(२)*	**सा.बां. विभागाने सुधारित केलेले खर्चाचे अंदाज** *(३)*
१.	सिडको, औरंगाबाद, येथील निवासस्थानांची दुरुस्ती, जलनि:सारण व पिण्याच्या नळमार्ग (Pipe line) याची दुरुस्ती, संरक्षक भिंत, इत्यादि.	रु.६,२७,२०,०००/-
२.	कन्नड (तालुका-कन्नड) येथील निवासस्थानांची विद्युतीकरणासह दुरुस्ती.	रु.४६,९८,२३१/-

अ.क्र. (१)	कामाचे नाव (२)	सा.बां. विभागाने सुधारित केलेले खर्चाचे अंदाज (३)
३.	पिशोर (तालुका-कन्नड) येथील निवासस्थानांची विद्युतीकरणासह दुरुस्ती.	रु.३५,८४,०३०/-
४.	खुल्ताबाद (तालुका-खुल्ताबाद) येथील निवासस्थानांची विद्युतीकरणासह दुरुस्ती.	रु.३९,१०,२००/-
५.	वैजापूर (तालुका-वैजापूर) येथील निवासस्थानांची विद्युतीकरणासह दुरुस्ती.	रु.१,००,८०,०००/-
६.	शिलेगांव (तालुका-गंगापूर) येथील निवासस्थानांची विद्युतीकरणासह दुरुस्ती.	रु.४५,२२,९९९/-
एकूण		**रु.८,९५,१५,४६०/-**

४. परिच्छेद ३ मधील तक्त्यातील स्तंभ *(२)* मधील कामांना स्तंभ *(३)* मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या खर्चाच्या अंदाजांसह प्रशासकीय मान्यता देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने, पुढील अटींवर, सहमती दिली आहे:-

1. **१)** उक्त कामांना (खर्चाच्या अंदाजांना) तांत्रिक मंजूरी ही सन २०१७-१८ च्या राज्य दरसूचीनुसार प्रदान करण्यात यावी.
2. **२)** उक्त खर्चाचे अंदाज हे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, औरंगाबाद, यांनी साक्षांकित करावे.

५. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण), यांच्या अधिकारक्षेत्रातील, परिच्छेद ३ मधील तक्त्यातील स्तंभ *(२)* मधील कामांना स्तंभ *(३)* मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या खर्चाच्या अंदाजांसह एकूण **रु.८,९५,१५,४६०/-** इतक्या रकमेस, परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेल्या अटींवर, याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

६. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) (*दत्तमत*) (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७०२/इमा-२, दिनांक १२.१०.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१०३०१५३४२३०७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.10.30 15:22:09 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद.
३) पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण).

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, औरंगाबाद *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Abstract" च्या प्रतीसह).*
२) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/विनियम), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).